**रे. दि. मु. क्र. ११५/२०१७**

श्री. सुनिल गोविंद यादव ..... **वादी**

**वि.**

मा. जिल्हाधिकारी, महाराष्ट्र शासन सातारा व इतर .... **प्रतिवादी**

**नि. ५ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द कायमचा मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे दाखल केलेले नाही.

३. वादींचे वकिलांचा यक्तिवाद ऐकला. वादींचे वकिलांचे निवेदन असे की, वादीने ३० ब्रास वाळू स्वतःच्या घर बांधकामासाठी खरेदी केली आहे. परंतू प्रतिवादींनी दि. १५/१२/२०१६ व दि. १४/०३/२०१७ रोजी वादीस नोटीस पाठवून त्यामध्ये वादीने बेकायदा ५४ ब्रास वाळूचा साठा केला असल्याचे नमूद करुन त्या वाळूचा लिलाव करणार असल्याचे म्हटले आहे. त्या वाळूचा लिलाव झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. म्हणून त्यांचेविरुध्द तात्पुरता मनाई आदेश देणेत यावा.

४. अर्जातील कथने व युक्तिवाद विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्याच्या निष्कर्षासह खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष् |
|---|---|---|
| १ | वादी यांना दाव्यामध्ये सकृतदर्शनी परिस्थिती असल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे का ? | होय |
| २ | न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने आहे का? | होय |

| | | |
|---|---|---|
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे का? | **होय** |
| ४ | अंतिम आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजूर केला आहे.** |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** -

५. सदरचे मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्यावर एकत्रितरित्या चर्चा करुन निष्कर्ष् देत आहे.

६. या अर्जाच्या पृष्ट्यर्थ वादीने दि. ०३/०२/२०१५ ते दि. २७/०९/२०१५ या काळातील ३० ब्रास वाळू खरेदीच्या पावत्या दाखल केल्या आहेत. ५४ ब्रास वाळूचा साठा केलेला नाही असे वादीचे म्हणणे आहे. सदरची वाळू वादीने त्याचे मौजे कोर्टी येथील प्लॉट क्र. १०८ मध्ये घर बांधण्यासाठी खरेदी केली होती. ती वाळू त्याने त्याच्या मालकीच्या जागेत ठेवली होती. वादीने त्याच्या नियोजीत घराच्या बांधकामाचा आराखडाही दाखल केला आहे. तथापि, वादीच्या म्हणण्यानुसार कोर्टी ग्रामपंचायतीने बांधकाम परवाना देण्याचे बंद केल्याने बांधकाम करता आले नव्हते. प्रतिवादींनी दि. १५/१२/२०१६ रोजी गौख/साठेलि / एस आर /३५/२०१६ प्रमाणे वादीचा वाळू साठा जप्त केला. त्याबाबत वादीने खुलासा केला होता. लिलावाची नियोजीत तारीख दि. ३०/०३/२०१७ नेमली होती. परंतू प्रतिवादींविरुध्द ' जैसे थे ' परिस्थिती ठेवणेचा आदेश पारित झाल्याने लिलाव झाला नाही.

७. वादीने दाखल केलेल्या कागदांवर, त्याच्या कथनांवर प्रतिवादींनी आक्षेप घेतलेला नाही. या अर्जाबाबत त्यांनी म्हणणेही दाखल केलेले नाही.

८. वादीने दाखल केलेली कागदपत्रे व वादीचे शपथेवरील कथन विचारात घेता वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी बाब आहे. न्यायाचे समतुलत्व त्याच्या बाजुने आहे. अशा स्थितीत जर वादीच्या

बाजुने मनाई आदेश दिला नाही व वाळूचा लिलाव झाला तर वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. म्हणून या मुद्यांचा निष्कर्ष् मी **होकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** -

९. वरील मुद्यांच्या चर्चेवरुन वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र असलेचे दिसते. म्हणून मी खालील आदेश देतो.

# आदेश

१. प्रतिवादी क्र. १ व २, अगर त्यांचेतर्फे कोणीही इसम यांना तात्पुरता मनाई आदेश देणेत येतो की, या दाव्याचा अंतिम निर्णय लागेपर्यंत वादीच्या वाळू साठयाचा लिलाव करु नये.

२. या अर्जांचा खर्च हा दाव्याच्या मूळ खर्चात समाविष्ठ राहील.

(न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत केले)

सही/- XX
**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड

कराड.
दि. २१/०७/२०१७

सही/- XX
गणेश धों. जाधव,
लघलेखक (नि. श्रे.)